ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV October - December - 2018

Marathi Part - VI / VII

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.505
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole

M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **“AJANTA”**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Published by :**

Ajanta Prakashan, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, Ph.No. : (0240) 2400877

E-mail : ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 5.505 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD


**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. A. Koli**
Professor & Head (Retd.),
Department of Economics,
Shivaji University, Kolhapur.

# EDITORIAL BOARD


**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.



PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.505 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - VI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराजांची लष्कर व्यवस्था<br>**प्रा. सीमा जा. भोसले** | १-६ |
| २ | जगातील वाढता दहशतवाद एक गंभीर समस्या व त्यावरील उपाय<br>**प्रा. डॉ. महेंद्र पांडुरंग पवार** | ७-१० |
| ३ | अनुवाद : भाषा आणि संस्कृती<br>**डॉ. नानासाहेब शामराव यादव** | ११-१६ |
| ४ | पंचायतीचे महत्व व कार्ये - आरमोरी व गडचिरोली तालुक्याच्या संदर्भात<br>**प्रा. डॉ. आर. एम. झाडे**<br>**श्री. प्रकाश तुकाराम हेमने** | १७-२१ |
| ५ | प्रल्हाद केशव अत्रे लिखित 'बुवा तेथे बाया' या नाटकातील अंधश्रद्धेवर आधारित होणारा सामाजिक परिणाम : काल आणि आज<br>**कृष्णा पांडुरंग हजारे** | २२-२४ |

# CONTENTS OF MARATHI PART - VII


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | लक्ष्मण माने यांच्या साहित्यातील बोलीचा वापर<br>**प्रा. डॉ. राम गायकवाड** | १-५ |
| २ | आदिवासी समाजाची ओळख व भारतीय आदिवासी समाज<br>**प्रा. सौ. सुप्रिया संग्राम पवार** | ६-१० |
| ३ | शिक्षणशास्त्र व संगणकशास्त्र अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची संगणक अभिवृत्तीचा अभ्यास करणे<br>**मनिषा नारायणराव भंडारे** | ११-१४ |
| ४ | भाषा व संवादाचे जीवनातील महत्त्व<br>**प्रा. डॉ. वृंदा देशपांडे** | १५-१९ |
| ५ | स्थानिक स्वशासन आणि जन सहभाग - एक प्रशासकीय अभ्यास<br>**संजय शेषराव लहाने** | २०-२३ |
| ६ | विश्वशांती आणि बौद्धमत<br>**डॉ. महेंद्र गायकवाड** | २४-२९ |
| ७ | महिला सक्षमीकरणात पुरूषांची भूमिका<br>**विनीता भीमराव केकान** | ३०-३४ |
| ८ | शिक्षणातील संशोधन व व्यवस्थापनाचा एक अभ्यास<br>**आहिरे विद्या मुरलीधर** | ३५-४१ |
| ९ | स्त्रियांवर होणारे कौटुंबिक हिंसाचार - एक अभ्यास<br>**राजेंद्र भगवानराव सानप** | ४२-४६ |
| १० | आदिवासी साहित्य वाटचाल आणि विकास<br>**रेखा नारायण वाघ** | ४७-५० |
| ११ | कवितांचे बदलते आयाम आणि अध्यापन पद्धती<br>**रिना सुधाकर श्रीसुंदर** | ५१-५६ |
| १२ | गडचिरोली जिल्हयातील दारूबंदीपुढील आव्हानांचा तुलनात्मक अभ्यास<br>**कु. दीपा नत्थुजी उंदिरवाडे**<br>**डॉ. श्रीराम श्रा. कावळे** | ५७-६० |
| १३ | भारतीय संविधान आणि अनुसूचित जमाती<br>**अशोक पाडवी** | ६१-६७ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.505 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - VII


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | स्त्री भ्रुणहत्या एक सामाजिक समस्या<br>**संघमित्रा धोत्रे** | ६८-७१ |
| १५ | प्राचीन ठाणे परिसरातील प्रशासन व्यवस्था कालखंड (राष्ट्रकुट कालखंड)<br>**दांडगे आनंद नामदेवराव** | ७२-७४ |
| १६ | द.ग. काळे - एक सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाह सबंधी इतिहासकार<br>**प्रा. डॉ. जे. डी. गोपाळ** | ७५-७८ |
| १७ | भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवा क्षेत्राचे महत्त्व आणि परकीय थेट गुंतवणूकीची भूमिका<br>**शशिकांत लक्ष्मणराव भोज** | ७९-८६ |
| १८ | महिला उत्थानात साहित्याची भूमिका<br>**प्रा. पंकज तिजारे**<br>**डॉ. हिरालाल मेश्राम** | ८७-८९ |
| १९ | समकालीन साहित्य प्रवाहांची सद्यस्थिती 'दलित कविता'<br>**प्रा. ए. एस. खैरमोडे** | ९०-९६ |
| २० | साकोली विधानसभा क्षेत्रातील मतदार वर्तनाला प्रभावित करणाऱ्या घटकांचे अध्ययन<br>**लोमेश नानाजी देशमुख**<br>**डॉ. राजेंद्र एस. मुद्दमवार** | ९७-१०२ |
| २१ | भारतातील स्त्री शिक्षणाच्या पार्श्वभूमीचा एक ऐतिहासिक अभ्यास<br>**श्री. तरवटे बाबासाहेब आप्पाराव**<br>**श्रीमती डॉ. एस. व्ही. जोशी** | १०३-१०७ |
| २२ | विविध स्तरावरील शिक्षणात शिक्षकाची भूमिका एक शैक्षणिक अभ्यास<br>**डॉ. रोहिदास नामदेव उद्‌मल्ले** | १०८-११२ |
| २३ | पारंपारिक लोकजीवनाचे प्रतिबिंब : लोकसाहित्य<br>**प्रा. रणधीरसिंह बा. पवार** | ११३-११५ |
| २४ | ग्रामीण साहित्याची चळवळ आणि वाटचाल<br>**प्रा. मिलिंद शत्रुघ्न ठोकळे** | ११६-१२० |
| २५ | 'वऱ्हाड समाचार' विदर्भाचे पहिले मराठी वृत्तपत्र<br>**प्रा. सतिश बं. राठोड** | १२१-१२४ |
| २६ | भारतातील अल्पसंख्याक (मुस्लिम) समाजातील शैक्षणिक स्थितीचा - एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. शेख मारुफ फकीरमहमद** | १२५-१२९ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.505 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - VII


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | महात्मा गांधीजींचे शिक्षण विषयक विचार - एक अभ्यास<br>**प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव** | १३०-१३२ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.505 (www.sjifactor.com)**

# २७. महात्मा गांधीजींचे शिक्षण विषयक विचार - एक अभ्यास

**प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव**
समाजशास्त्र विभाग, विवेकानंद महाविद्यालय (स्वायत्त), कोल्हापूर.

**प्रस्तावना**

आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये महात्मा गांधींचे बहुआयामी योगदान आहे. गांधीजींची शैक्षणिक विचारधारा त्यांच्या नैतिकता आणि स्वावलंबनाच्या तत्त्वावर आधारित होती. गांधीजी ज्ञानावर आधारित शिक्षणाऐवजी आचार आधारित शिक्षणाचे समर्थक होते. त्यांच्या मते शिक्षण पद्धती अशी असावी की, ती व्यक्तीला चांगल्या वाईटाचे ज्ञान देऊन त्याला नैतिक बनण्यास प्रवृत्त करते. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी शिक्षण हे एक सशक्त माध्यम मानले. गांधीजींचा असा विश्वास होता की, एखादी व्यक्ती आपल्या मातृभाषेतून अधिक आवडीने आणि सहजतेने शिक्षण घेऊ शकते. त्यामुळे त्या व्यक्तीला सुरुवातीचे शिक्षण त्याच्या मातृभाषेत देण्याच्या बाजूने ते होते. स्वावलंबनाला दिलेल्या महत्त्वामुळे गांधीजींचा स्पष्टपणे विश्वास होता की, शिक्षणाने लोकांमध्ये कौशल्य वाढवली पाहिजे, जेणेकरून एखादी व्यक्ती लघु आणि कुटीर उद्योगांच्या माध्यमातून स्वावलंबी होऊ शकते.

महात्मा गांधींचे शिक्षणाचे तत्त्वज्ञान हे आदर्शवाद, निसर्गवाद आणि व्यवहारिकता यांचे सुसंवादी मिश्रण आहे. आदर्शवाद हा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा आधार आहे तर निसर्गवाद आणि व्यवहारिकता हे तत्त्वज्ञान आचरणात आणण्यासाठी उपयुक्त आहेत. म्हणूनच ते व्यावहारिक आदर्शवादी म्हणून ओळखले जातात. जीवनासाठी शिक्षण, जीवनाद्वारे शिक्षण आणि आयुष्यभर शिक्षण महात्मा गांधींच्या या व्याख्येत शिक्षणाच्या अंतर्गत कल्पना करता येईल अशा सर्व गोष्टींचा समावेश असेल.

**उद्दिष्टे**

1. महात्मा गांधीजींच्या शिक्षणावरील विचारांची वर्तमानातील प्रासंगिकता अभ्यासणे.
2. महात्मा गांधी यांचे स्त्री व पुरुष समानतेबाबत शिक्षणविषयक विचार अभ्यासणे.
3. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाचे महत्त्व जाणून घेणे.

**गृहीतके**

1. महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक विचार प्रासंगिक आहेत.
2. महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक विचार स्त्री व पुरुषांसाठी समान आहेत.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय तथ्य संकलन तसेच विविध ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

**महात्मा गांधीजींचे शिक्षण विषयक विचार**

महात्मा गांधींनी प्राथमिक शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षण, प्रौढ शिक्षण, महिलांचे शिक्षण, व्यवसायधिष्ठित शिक्षण तसेच प्राथमिक शिक्षण हे मोफत आणि सक्तीचे असावं ते मातृभाषेतून देण्यात यावं त्याचा संबंध सभोवतालच्या परिसराशी असावा अशा वेगवेगळया पातळयावर शिक्षणाचा विचार केला आहे. महात्मा गांधींनी प्रस्तावित केलेल्या शिक्षण पद्धतीला "मूलभूत शिक्षण" असे म्हणतात. त्यांनी मुख्यत्वे मातृभाषेतील शिक्षणाचे उद्दिष्ट ठेवले आणि मुलांना कुशल आणि स्वावलंबी बनवण्याची क्रिया - कलाप केंद्रित शिक्षणाचे आवाहन केले. गांधीजींना समाजात राहणाऱ्या छोट्या सहकारी आणि कष्टाळू, स्वाभिमानी आणि उदार व्यक्तींचे आदर्श नागरिक असलेले छोटे, स्वयंपूर्ण समुदाय निर्माण करायचे होते. मुलांचे मन, शरीर आणि आत्म्याचा सुसंवादीपणे विकास व्हावा आणि त्यांच्या भावी जीवनाच्या गरजा ही पूर्ण व्हाव्यात यासाठी काही स्थानिक कलाकुसर त्यांच्या शिक्षणाचे माध्यम बनवाव्यात अशी त्यांची इच्छा होती.

**गांधीजींची नई तालीम**

ही भारतात फार नावाजलेली गोष्ट होती. 7 ते 14 वर्षे वयातील सर्व मुलांना विनामूल्य व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यात यावे व प्राथमिक शिक्षण स्वयंपूर्ण आणि पायाभूत स्वरूपाचे असावे नवीन अहिंसात्मक समाज व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने पायाभूत शिक्षण हे महत्त्वाचे असून ते नवीन पीडित अहिंसाधिष्ठित मूल्यांची निर्मिती करण्यास उपयुक्त आहे असे त्यांचे मत होते. ते जीवनोपयोगी असल्याने त्याला पायाभूत असे म्हणत.

**गांधीजींच्या शिक्षणावरील विचारांची वर्तमानातील प्रासंगिकता**

सध्या भारतीय समाजाच्या समस्यांचे प्रमुख कारण म्हणजे व्यक्तीचा भ्रष्टाचार, वाढता स्वार्थ आणि नैतिकतेची घसरण अशा परिस्थितीत शिक्षणाच्या माध्यमातून नैतिकतेचा प्रसार केल्यास या समस्या सुटतील. प्राथमिक शिक्षणात मातृभाषेला महत्त्व देण्याचा गांधीजींचा विचारही समर्पक आहे. त्यामुळे मुलांमध्ये शिक्षणाची आवड कायम राहील आणि प्रवेशाचे प्रमाणही वाढेल. यासोबतच शिक्षणाला हस्तकला आणि कौशल्यांशी जोडल्यास बेरोजगारी आणि गरिबीची समस्या दूर होईल आणि भारत आपल्या लोकसंख्या शास्त्रीय लाभांशाचा लाभ घेऊ शकेल. पण आठवी नंतर इंग्रजीतून शिक्षण देण्याची सक्ती सध्याच्या काळात फारशी सुसंगत नाही कारण सध्याच्या काळात इंग्रजीचे महत्त्व वाढले आहे याशिवाय इयत्ता सातवी पर्यंत हिंदी भाषेतून शिक्षण देण्याची सक्ती अहिंदी भागातील लोकांसाठी समस्या निर्माण करू शकते. पण या मर्यादा मानून गांधीजींच्या शिक्षणावरील विचारांचे महत्त्व कमी करता येणार नाही. किंबहुना महात्मा गांधींचे शिक्षणाबाबतचे विचार केवळ आजच्या काळाशी संबंधित नाहीत तर आजच्या काळाची गरजही आहेत.

शिक्षण हे समाजबदलांचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. समाजजीवनाला नवी दिशा देण्याचे कार्य शिक्षणच करू शकते. हा विचार गांधीजी मांडताना दिसतात. आजच्या काळातही शिक्षण पद्धती ही वेगवेगळया क्षेत्रात जोर धरून लागली आहे. वर्तमान शिक्षण पद्धतीत महात्मा गांधीजींच्या शैक्षणिक विचारांची बीजे रोवलेली दिसतात. गांधीजींच्या मते शिक्षण हे फक्त पुस्तकी शिक्षण

नको तर शिक्षणामुळे बुद्धी, शरीर, हृदय या तिन्हीचा समतोल विकास साधता आला पाहिजे. म्हणजेच आजच्या वर्तनात शिक्षण प्रणालीचा ढासळलेला दर्जा हा महात्मा गांधीजींच्या शिक्षण विषयक विचाराने निश्चितच उंचावल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी गांधीजींच्या विचारांचा अवलंब करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष**

1. गांधीजींचे शिक्षण विषयक विचार हे विद्यार्थी केंद्री असून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने दिसून आले.
2. महात्मा गांधींचे शिक्षण विषयक विचार हे व्यवसायभिमुख असल्याचे दिसून आले.
3. महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक विचार आजच्या वर्तमान स्थितीत स्वीकारल्यास परिवर्तन होण्यासाठी मदत होऊ शकते.
4. महात्मा गांधीजींचे शिक्षण विषयक विचार आजच्या काळासाठी महत्त्वाचे ठरल्याचे दिसून आले.
5. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हे सशक्त माध्यम असल्याचे दिसून आले.

**संदर्भग्रंथ सूची**

1. डॉ. जयसिंगराव पवार, आधुनिक भारत, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर.
2. सुहास कुलकर्णी, मिलिंद चंपानेरकर, असा घडला भारत, रोहन प्रकाशन, पुणे.
3. पाटील डॉ. डी. आर., महात्मा गांधी विचार व समकालीन समाज.
4. श. गो. देवगावकर, राजकीय विचारवंत, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
5. शाह, पिके (2017), गांधीजीचे विचार मूलभूत शिक्षण आणि त्याची प्रासंगिकता, पुणे, इंग्लिश आंतरराष्ट्रीय जर्नल.
6. विजयालक्ष्मी एन, 21 व्या शतकातील गांधीवादी तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता.
7. इंटरनेट.